सत्यमेव जयते

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण**
**जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर**
स्वराज्य भवन, नागाळा पार्क, कोल्हापूर - ४१६००२
दुरध्वनी क्रमांक : 0231-2659232 टोल फ्री (1077)
Email: rainkolhapur@gmail.com

क्र. आधोव्य/कोरोना /57/2020,

दिनांक :-29/03/2020.

<u>वाचले</u>

1. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005,
2. महाराष्ट्र कोव्हीड उपाययोजना नियम 2020 व साथरोग अधिनियम-1897

विषय :- **श्री. विक्रांत चव्हाण, उपजिल्हाधिकारी यांची सेवा कोरोना प्रतिबंधक उपाययोजनांसाठी अधिग्रहित करणेबाबत.**

## -: आदेश :-

ज्याअर्थी कोल्हापूर जिल्हयामध्ये कोरोना विषाणु (कोविड-19) प्रतिबंधक उपाय योजना राबविणेत येत आहे. राज्यात साथरोग अधिनियम-1897 च्या अनुषंगाने, महाराष्ट्र कोव्हीड उपाययोजना नियम 2020 नियम अस्तित्वात आले असून ते दिनांक 14/03/2020 पासुन लागु करणेत आलेले आहे.

कोल्हापूर जिल्हयात कोरोना या विषाणूचा संसर्ग व संक्रमण प्रतिबंधक उपाय योजना पर्यवेक्षण व नियंत्रणाचे कामासाठी अतिरिक्त अधिकारी व कर्मचारी यांची आवश्यकता आहे.

श्री. विक्रांत चव्हाण, उपजिल्हाधिकारी हे सेवेचे आदेश नसलेने प्रशासकीय विलंबास्तव विनासेवा कोल्हापूर येथे निवासी आहेत. त्याअर्थी, मी दौलत देसाई, जिल्हाधिकारी कोल्हापूर, महाराष्ट्र कोव्हीड उपायायोजना नियम 2020 नुसार सक्षम प्राधिकारी म्हणुन श्री. विक्रांत चव्हाण, उपजिल्हाधिकारी यांची सेवा कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजना समन्वय करणेसाठी अधिग्रहित करण्यात येत आहेत.

कोल्हापूर जिल्हयातील कोरोना संसर्गाच्या अनुषंगाने श्री. विक्रांत चव्हाण, उपजिल्हाधिकारी यांनी जिल्हाधिकारी कोल्हापूर यांचे अधिनस्त कामकाज करणेचे आहे.

(दौलत देसाई)
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण**
**कोल्हापूर**

प्रति :- 1) श्री. विक्रांत चव्हाण, उपजिल्हाधिकारी
सदर आदेश प्राप्त झालेपासून 24 तासामध्ये हजर व्हावे व तात्काळ कामकाज सुरु करावे.

प्रत :-माहितीसाठी

1) मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे
2) मा. अपर मुख्य सचिव (महसुल, मुद्रांक व नोंदणी) महसुल व वन विभाग मंत्रालय, मुंबई-400032 यांना माहितीसाठी.
3) जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, नैसर्गिक आपत्ती नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर

(दौलत देसाई)
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण**
**कोल्हापूर**

Scanned by CamScanner